निशाणी क्र. ३७

**गैरअर्जदार तर्फे साक्षीदार क्र.९ चा उलटतपास अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एम. ए. शेख यांच्या मार्फत शपथेवर सुरु–**

४. माझ्या शपथपत्रात उल्लेख केलेले गैरअर्जदार क्र.२ ते ११ हे कोण आहेत हे मला सांगता येत नाहीत. मला त्यांचा नंबर माहित नाही परंतू मी त्या गैरअर्जदारांना ओळखतो.

प्रश्न – गैरअर्जदार क्र.९ यांनी अर्जदाराचा काय छळ केला ?

उत्तर – मी छळ केलेला नाही.

सुलभा औरंगाबाद येथून पळून गेल्याची मी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार केलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानेश्वरच्या उत्पन्नाची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी पैशाची मागणी करुन सुलभाला घरातून हाकलून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कुटूंबामध्ये २५ एकर शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. ज्ञानेश्वर यांच्याकडे २० गुंठे शेती आहे. माझी स्वतःची २.५ एकर शेती आहे. माझ्या वडीलोपार्जीत शेतीची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.07.30 17:43:17 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा**

**जिल्हा लातूर.**

**दिनांक ३०/०७/२०२५.**

**ठिकाण निलंगा.**